# University of Mumbai

## परिपत्रक

No.Enrol/Elg./admission/(2020-21) /315 of 2020

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित/संचलित सर्व कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयांचे प्राचार्य / मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक, संचालक, उपपरिसर (ठाणे व रत्नागिरी) यांना कळविण्यात येते की, विद्यापीठाने Enrol/Elg.admission/(2020-21)/1817 of 2020 दिनांक २१ जुलै, २०२०, Enrol/Elg./admission/(2020-21)/1822 of 2020 दिनांक ४ ऑगस्ट, २०२० आणि No.Enrol/Elg./admission/(2020-21)/1823 of 2020 दिनांक ६ ऑगस्ट, २०२० आणि Enrol/ Elg./ admission/ (2020-21)/131 of 2020 दिनांक १७ ऑगस्ट, २०२० अन्वये प्रथम वर्ष (First Year) प्रवेश प्रक्रियेबाबत वेळापत्रक (Time Table) जाहीर केले होते, त्यानुसार दिनांक ५ ऑगस्ट, २०२० आणि दिनांक १४ ऑगस्ट, २०२० आणि २१ ऑगस्ट, २०२० रोजी विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया नोंदणी लिंक बंद करण्यात आली होती व वेळापत्रकाप्रमाणे दिनांक ६ ऑगस्ट, २०२० रोजी पहिली गुणवत्ता यादी (First Merit List), द्वितीय गुणवत्ता यादी (Second Merit List) दिनांक ११ ऑगस्ट, २०२० आणि तृतीय गुणवत्ता यादी (Third Merit List) दिनांक १७ ऑगस्ट, २०२० आणि चतुर्थ गुणवत्ता यादी (Fourth Merit List) २४ ऑगस्ट, २०२० रोजी जाहीर करण्यात आलेली आहे. परंतू त्यानंतर काही विद्यार्थी www.mum.digitaluniversity.ac या विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रवेश नोंदणी करू शकले नव्हते, अशा विद्यार्थ्यांसाठी www.mum.digitaluniversity.ac या संकेतस्थळावरील प्रवेश नोंदणी लिंक दिनांक १० सप्टेंबर, २०२० संध्याकाळी ५.००,२५ सप्टेंबर, २०२० संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत व ३१ ऑक्टोबर, २०२० संध्याकाळी ०६.०० वाजेपर्यंत प्रवेश नोंदणीसाठी उपलब्ध करुन देण्यात आली होती.

**परंतु अद्यापही काही विद्यार्थी www.mum.digitaluniversity.ac या विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रवेश नोंदणी करु शकले नाहीत. त्यामुळे www.mum.digitaluniversity.ac या संकेतस्थळावरील प्रवेश नोंदणी लिंक दिनांक १२ नोव्हेंबर, २०२० संध्याकाळी ०६.०० वाजेपर्यंत प्रवेश नोंदणीसाठी उपलब्ध करून देण्याते येत आहे.**

या लिंक मधुन विद्यार्थी आपली प्रवेश नोंदणी करू शकतील. सदर विद्यार्थ्यांना ज्या महाविद्यालयात प्रवेश घ्यायचा असेल त्या महाविद्यालयाची गुणवत्ता यादी जाहीर झाल्यावर संबधीत महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर प्रवेशाची पुढील कार्यवाही करावी. ज्या विद्यार्थ्यांनी या आधी महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर नोंदणी केली होती परंतू प्रवेश घेतले नाहीत अशा विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर पुनश्च नोंदणी करावी. जर महाविद्यालयामध्ये जागा शिल्लक असल्यास महाविद्यालयांनी आपल्या स्तरावर गुणवत्ता यादी जाहीर करावी व प्रवेश प्रक्रिया राबवावी.

ठिकाण : मुंबई - ४०००३२
दिनांक : ६ नोव्हेंबर, २०२०

(डॉ. विनोद पाटील)
प्रभारी कुलसचिव